# मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा :

शेतजमिनील माती व पाणी नमुने तपासणीसाठी राज्यात पालघर , नंदूरबार, हिंगोली, वाशिम व गोंदिया हे पाच जिल्हे वगळता 29 जिल्हयांमध्ये प्रत्येकी एक प्रमाणे 29 शासकीय जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत . पालघर, नंदूरबार, हिंगोली, वाशिम व गोंदिया या जिल्हयांमधील माती व पाणी नमुने तपासणी अनुक्रमे ठाणे , धुळे, परभणी, अकोला व भंडारा येथील शासकीय जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळांमधून केली जाते.

| अ. क्र. | बाब | तपशिल | प्रति लाभार्थी महत्तम मर्यादा | तपासणी शुल्क व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते. | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहीत कालावधीत न मिळाल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण मृद नमुना तपासणी | या नमुन्यांमध्ये शेत जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाश या पिक पोषक घटकांचे प्रमाण तसेच जमिनीतील विद्राव्य क्षार आणि जमिनीचा आम्ल-विम्ल निर्देशांक यांची तपासणी केली जाते. तपासणी शुल्क प्रति नमुना रु. 35 इतके आकारण्यात येते. | मृद / पाणी तपासणीसाठी प्रति लाभार्थी महत्तम मर्यादा नाही. शेतकरी त्यांच्या इच्छेनुसार / गरजेनुसार कितीही मृद / पाणी नमुने कितीही | नंतरच्या पिकासाठी खत वापराच्या शिफारशींसह 30 दिवसांत मृद पृथःकरण अहवाल शेतक-यांना पुरविले जातात. | 1. जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी<br>2. मंडळ कृषि अधिकारी<br>3. तालुका कृषि अधिकारी<br>4. उपविभागीय | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| 2 | सुक्ष्म मुलद्रव्ये मृद नमुना तपासणी | या नमुन्यांमध्ये शेत जमिनीतील तांबे, लोह, मंगल आणि जस्त या चार घटकांची तपासणी केली जाते. या चार घटकांच्या तपासणीसाठी प्रति नमुना रु. 200 इतके तपासणी शुल्क आकारण्यात येते. मात्र या चार घटकांपैकी कोणत्याही एका घटकाचीच तपासणी करावयाची असल्यास रु. 100 इतके तपासणी शुल्क आकारण्यात येते. | | | | |
| 3 | विशेष मृद नमुना तपासणी | या नमुन्यांमध्ये मातीतील मुक्त चुना, सेंद्रीय कर्ब, आद्रतेचे प्रमाण, कायिक गुणधर्म जसे जाड वाळू, पोयटा, चिकण आदीचे शेकडा प्रमाण तसेच आम्ल-विम्ल निर्देशांक, विद्युत वाहकता, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम, पालाश व स्फुरद इ. घटकांकरिता पृथःकरण केले जाते. तपासणी शुल्क प्रति नमुना रु. 275 इतके आकारण्यात येते. | | | | |

| अ. क्र. | बाब | तपशिल | प्रति लाभार्थी महत्तम मर्यादा | तपासणी शुल्क व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते. | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहीत कालावधीत न मिळाल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | पाणी नमुना तपासणी | पाणी नमुन्यांमध्ये पाण्याचा सामू, वि'ुत वाहकता, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम, पालाश व कार्बोनेट्स, क्लोराईड्स, सल्फेट आणि नायट्रेट्सचे पृथःकरण केले जाते. तपासणी शुल्क प्रति नमुना रु. 50 इतके आकारण्यात येते. | वेळा तपासणीसाठी पाठवू शकतात. | | कृषि अधिकारी | |